RNI No. MAHBIL/2009/35530
Reg. No. MH/MR/South-341/2011-13

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग चार

वर्ष ४, अंक १८(२)] मंगळवार, ऑगस्ट १४, २०१२/श्रावण २३, शके १९३४ [पृष्ठे ५, किंमत : रुपये १५.००

## असाधारण क्रमांक ३०

## प्राधिकृत प्रकाशन

### महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

### अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१.— महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग अधिनियम, २००४ यात सुधारणा करण्याकरिता अधिनियम .. .. .. .. .. | १—२ |

दिनांक ८ ऑगस्ट २०१२ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

ह. का. पटेल,
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

## सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१.

(माननीय राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर " महाराष्ट्र शासन राजपत्रात " दिनांक १४ ऑगस्ट २०१२ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम).

### महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग अधिनियम, २००४ यात सुधारणा करण्याकरिता अधिनियम.

२००५ चा महा. ३१. ज्याअर्थी, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग अधिनियम, २००४ यात सुधारणा करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या त्रेसष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग (सुधारणा) अधिनियम, २०१२ असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१ यामध्ये कलम १०क समाविष्ट करणे.

२. महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग अधिनियम, २००४ याच्या कलम १० नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— २००५ चा महा. ३१.

आयोगाचे अधिकार.

" १०क. आयोगास, कलम १० च्या पोट-कलम (१) खालील त्याचे कोणतेही कार्य पार पाडताना, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये दाव्याची न्याय चौकशी करणाऱ्या दिवाणी न्यायालयाचे सर्व अधिकार असतील, आणि ते विशेषतः पुढील बाबींसंबंधात असतील :— १९०८ चा ५.

(क) राज्याच्या कोणत्याही भागातील कोणत्याही व्यक्तीला समन्स पाठवणे व तिला हजर राहण्यास भाग पाडणे आणि तिची शपथेवर तपासणी करणे ;

(ख) कोणत्याही दस्तऐवजाचा शोध घेण्यास व तो सादर करण्यास फर्मावणे ;

(ग) शपथपत्रांवर पुरावा स्वीकारणे ;

(घ) कोणत्याही कार्यालयाकडून कोणताही सार्वजनिक अभिलेख किंवा दस्तऐवज किंवा अशा अभिलेखाची किंवा दस्तऐवजाची प्रत मागवणे ; आणि

(ङ) साक्षीदारांची आणि दस्तऐवजांची तपासणी करण्यासाठी आयोगपत्र काढणे.".

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.